Prof . Shriniwas Hemade, hodphilosphy, madshri@gmail.com, 9226563052

# प्रकरण तिसरे
# भारतीय तत्त्वज्ञानाचा परिचय

अ) भारतीय तत्त्वज्ञानाची मुख्य वैशिष्ट्ये
ब) भारतीय दर्शन परंपरा
(शंकराचार्यांचे वेदान्त दर्शन, सांख्य दर्शन, बौध्द दर्शन आणि चार्वाक दर्शन )

## (अ) भारतीय तत्त्वज्ञानाची मुख्य वैशिष्ट्ये



### 1) भारतीय तत्त्वज्ञान - एक संकल्पना :

तत्त्वज्ञानाचे स्वरप आपण पाहिलेच आहे. येथे फक्त त्याची उजळणी करु.पाश्चात्यांच्या मते तत्त्वज्ञान म्हणजे शहाणपणाचे प्रेमिक असणे. माणसाचे स्वरुप बुध्दिमान, विवेकशील प्राणी असे आहे. आपले जीवनमान सुधारण्यासाठी तत्त्वज्ञानाची गरज आहे.चिकित्सा केल्याशिवाय जगणे, हे प्राण्याच्या पातळीवरील जगणे आहे,तत्त्वज्ञान संस्कृतीचा मूलाधार असते,तत्त्वज्ञानाचा अभ्यास समाजोपयोगी आणि केवळ तत्त्वचिंतनासाठी करावा, ही ग्रीक- पाश्चात्यांची कल्पना आहे. आता आपण भारतीयांची संकल्पनाही तपासून पाहू.

### 'भारतीय दर्शन ' चा अर्थ आणि व्याप्ती :

'भारतीय तत्त्वज्ञान' ही फारच समृध्द संकल्पना आहे.कारण जगातील कोणत्याही देशात न घडलेली घटना भारतात घडलेली आहे.ती म्हणजे या एका देशाने जगाला चार धर्म व तत्त्वज्ञाने दिली. हिंदू ,बौध्द,जैन आणि शिख. या सर्वच धर्माच्या रचनेत फरक आहे.बौध्द व जैन धर्माला प्रत्येकी एकच तत्त्वज्ञान आहे तर हिंदु धर्माला एकापेक्षा जास्त तत्त्वज्ञाने आहेत.त्यांनाच 'दर्शन' असे नाव असून तेच बौध्द व जैन तत्त्वज्ञानांनाही नंतर मिळाले.

### हिंदु व भारतीय यातील फरक

भारतीय दर्शने किंवा भारतीय तत्त्वज्ञान म्हणजे नेमके कोणते तत्त्वज्ञान ? आता, येथे भारतीय तत्त्वज्ञान आणि हिंदु तत्त्वज्ञान (Indian Philosophy and Hindu Philosophy) यातील सूक्ष्म फरक लक्षात घेतला पाहिजे. या दोन्ही गोष्टी एकच वाटतात.पण त्या एकच नाहीत, त्यात फरक आहे. कारण हिंदु व भारतीय याच संकल्पना वेगवेगळ्या आहेत.

हिंदु, म्हणजे भारत नावाच्या भौगोलिक भागात राहणारा असा 'हिंदु' संज्ञेचा अर्थ केला तर हिंदु म्हणजे भारतीय, असे म्हणणे बरोबर आहे. परंतु पण भारतीय म्हणजे केवळ हिंदु नाही. कारण भारत हा बहुधर्मिय देश आहे.

परंपरेनुसार भारतात तीन प्राचीन धर्म आहेत. हिंदु,बौध्द व जैन धर्म. (या तीन धर्मात तीनशे वर्षापूर्वी आणखी एका नव्या धर्माची भर पडली. तो म्हणजे शिखधर्म. शिख म्हणजे शिष्य.) आपण जेंव्हा 'हिंदु तत्त्वज्ञान ' असा शब्दप्रयोग करतो तेंव्हा ज्यास 'हिंदुत्त्ववाद' म्हणतात.आणि त्यावर श्रध्दा असणारे तत्त्वज्ञान ते **'हिंदु तत्त्वज्ञान'**. हे तत्त्वज्ञान मानणारी व्यक्ति ती हिंदुत्त्ववादी व्यक्ति, असा अर्थ होतो.

**'भारतीय तत्त्वज्ञान'** या शब्दप्रयोगानुसार हिंदु,बौध्द व जैन धर्म अशा तीनही धर्मातील तात्त्विक विचारांचा समावेश होतो. या तीनही धर्मांचा समावेश ***'भारतीय तत्त्वज्ञान"*** या संकल्पनेत होतो.आपण निवडक भारतीय दर्शनांचा परिचय करुन घेणार आहोत, केवळ हिंदु तत्त्वज्ञानाचा नाही. त्यातही काही निवडक हिंदु तत्त्वज्ञानाचाच समावेश आहे. सर्व तत्त्वज्ञानाचा नाही.

---

[1]इस्लाम व ख्रिश्चन धर्म भारतात स्थिरावले आहेत. त्यामुळे त्यांचाही समावेश भारतीय तत्त्वज्ञानात करावा, असा विचार मांडता येतो. ईस्लाममधील सुफी संप्रदाय तर भारतीय ईस्लाम मधूनच निर्माण झालेला आहे, अशीही चर्चा आहे. या संप्रदायास व्यापक लोकाश्रय मिळाला आहे.उदा. शिर्डीचे साईबाबा. अर्थात 'भारतीय इस्लाम', 'भारतीय ख्रिस्ती धर्म' असे काहीसे नवे येथील इस्लाम व ख्रिस्ती धर्मास मिळू शकते. )

## 2) भारतीय दर्शनांचे वर्गीकरण :

हिंदु धर्म आणि तत्त्वज्ञान ज्यावर आधारलेले आहे त्या ग्रंथास **'वेद'** म्हणतात. हा हिंदुधर्माचा मूळग्रंथ आहे. 'वेद' या संज्ञेचा अर्थ 'ज्ञान' असा होतो. वेद हे एक पुस्तक नसून अनेक ग्रंथांचा तो विशाल समूह आहे.त्यास *वैदिक साहित्य* म्हणतात. वेदाचे मुख्य चार प्रकार असून त्यांचे विषय पुढीलप्रमाणे :

**वेद :**

**अ) संहिताः** ऋग्वेद , यजुर्वेद , सामवेद, व अथर्ववेद.

**ब) ब्राह्मणे :** प्रार्थना व यज्ञविधी,देवांच्या कथा,मंत्रांचा अर्थ इ.

**क) आरण्यके :** अरण्यातील ऋषिमुनींचे जीव, ईश्वर, व विश्वविषयक विचार .

**ड) उपनिषदे :** वैदिक तत्त्वज्ञान .

या सर्वांचा इतिहासही ढोबळमानाने किमान 4000 वर्षांचा (म्हणजे ग्रीक तत्त्वज्ञानापेक्षा प्राचीन) आहे.

भारतीय तत्त्वज्ञानात चार्वाक, बौध्द, जैन, सांख्य, योग, न्याय, वैशेषिक, पूर्वमीमांसा व उत्तरमीमांसा अशा मुख्य नऊ दर्शनांचा समावेश आहे. भारतीय परंपरेनुसार वेद आणि इतर वैदिक साहित्याच्या आधारे तत्त्वज्ञानाचे वर्गीकरण करण्यात आले.जे वेद स्वीकारतात त्यांना **'आस्तिक दर्शने'** आणि जे वेद नाकारतात त्यांना **'नास्तिक दर्शने'** असे म्हणतात. वेद हा वर्गीकरणाचा मुख्य निकष असल्यामुळे आस्तिक दर्शनांना **'वैदिक दर्शने'** तर नास्तिक दर्शनांना **'अवैदिक दर्शने'** असेही म्हंटले आहे.

चार्वाक, बौध्द, जैन ही तीन नास्तिक दर्शने आहेत. सांख्य, योग, न्याय, वैशेषिक, पूर्वमीमांसा व उत्तरमीमांसा ही आस्तिक दर्शने आहेत. ही दर्शने सहा आहेत, म्हणून त्यांना **'षड्दर्शने'** म्हणतात.

यात चार्वाकांचे वैशिष्ट्य असे की त्यांनी वेदप्रामाण्य व ईश्वर नाकारलाच पण नास्तिक पक्षात मोडणाऱ्या बौध्द व जैन दर्शनांनाही कडवा विरोध केला. ते 'खऱ्या अर्थाने **'सेक्युलर'**[2] ' होते !

## 3) भारतीय दर्शनांचा विकासः पध्दती

भारतीय तत्त्वज्ञानाचा विकास पाश्चात्य तत्त्वज्ञानापेक्षा वेगळ्या रितीने झाला.पाश्चात्य परंपरेत तो मुख्यत: एकांगी व व्यक्तिकेंद्रीत रितीने होत गेला.भारतात मात्र नास्तिक व आस्तिक अशा सर्व दर्शनांचा विकास समन्वयाने एकत्रितच होत गेला.आधी एखादे दर्शन , मग दुसरे , त्यानंतर तिसरे दर्शन असा विकास न होता त्या सर्वांचा एकत्रित विकास झाला.हा विकास विशिष्ट पध्दतींनी झाला.

ही विकासाची पध्दती ही जणू काही भारतीय तत्त्वज्ञानाची methodology च होती. एकमेकांचे अस्तित्व टिकवित विरोधक दर्शनाचाही विकास होईल, याची काळजी घेत हा विकास झाला. त्यामुळे एकाचा अभ्यास म्हणजे इतरांचाही अभ्यास ! या पध्दतीलाच **'पूर्वपक्ष - उत्तरपक्ष पध्दती'** किंवा **' खंडन -मंडन पध्दती '** म्हणतात. ज्याचे खंडन करावयाचे तो **'पूर्वपक्ष'** व ज्याचे समर्थन करावयाचे तो **'उत्तरपक्ष'**. याची माहिती दुसऱ्या प्रकरणात घेतली आहेच.

---

[2]याचा मूळ अर्थ'इहवादी' म्हणजे भौतिक दृश्य हेच खरे असून माणसाचे भौतिक कल्याण हेच मानवी जीवानाचे उद्दिष्ट असले पाहिजे, असा त्याचा अर्थ होतो. तथापि राज्यशास्त्रात आणि राजकीय विचारविश्‍वात त्याचे अनेक अर्थ लावले गेले; ते सारे धर्माशी जोडले गेले. जसे की धर्मनिरपेक्षता, सर्वधर्मसमभाव इत्यादी. अनुषंगाने दोन अर्थ निश्‍चित केले गेले. पहिला अर्थ - देशाची घटना (कायदा)आणि शासकीय धोरणे यांच्यासमोर समाजातील विविध श्रध्दा आणि विविध स्तरातील सर्व लोक समान आहेत. दुसरा अर्थ - राजकारण आणि धर्म यांच्यात गल्लत न करता त्यांचे सरमिसळ करू नये, ही दोन्ही क्षेत्रे वेगवेगळी राखावीत. सेक्युलॅरिझमची प्रथम मांडणी प्राचीन ग्रीक कालापासून होत आहे.मार्क्स ऑरेलिअस (Marcus Aurelius 26 April 121 -17 March 180 AD) या राजकारण धुरंधर सम्राटाने आणि ग्रीक तत्त्वज्ञ पायथागोरसने (Epicurus341 - 270 BC) ती मांडली. नंतर Secularism हा शब्द George Jacob Holyoake (1817-1906) या ब्रिटीश लेखकाने वापरला. अधिकच्या माहितीसाठी पुढील वेबसाईट्सवर जावे.

http://en.wikipedia.org/wiki/Secularism
http://en.wikipedia.org/wiki/Secularism_in_India

Prof . Shriniwas Hemade, hodphilosphy, madshri@gmail.com, 9226563052



या प्रकारच्या वादविवादातून प्रत्येक दर्शनाने स्वत:चे मत टिकविण्यासाठी जी पध्दती स्वीकारली ती म्हणजे **गुरू - शिष्य परंपरा** होय. तिला जोडून आली ती टीका व भाष्य परंपरा . केवळ या गुरू - शिष्य परंपरेमुळेच प्रचंड वेदवाङमय , आस्तिक व नास्तिक दर्शने आज आपणांस उपलब्ध आहेत

## 4)भारतीय दर्शनांची सर्वसाधारण वैशिष्ट्ये

एखाद्या राष्ट्राचे तत्त्वज्ञान हे त्या राष्ट्राची संस्कृती आणि नागरी जीवनाचे सार असते.त्यामुळेच एखादे राष्ट्र समाजावून घ्यावयाचे असेल तर त्या राष्ट्राचे तत्त्वज्ञान समाजावून घेणे आवश्यक असते.त्या तत्त्वज्ञानावरच त्या राष्ट्राचे मूल्यमापन ठरत असते.(अर्थात त्या राष्ट्राने ते टिकवून त्यात भर घातली पाहिजे.)हे तत्त्वज्ञान त्या राष्ट्राच्या समृध्द वातावरणातून उगम पावत असते.

भारतीय तत्त्वज्ञानात अनेक दर्शने असली ती परस्पर विरोधी असली तरी त्या सर्वांनी मिळूनच इथली संस्कृति व नागरी जीवन नटलेले आहे.त्यासर्व दर्शनांमध्ये एक विशिष्ट एकोपा आहे.त्यातूनच एका व्यापक नैतिक दृष्टिकोनाची आणि अध्यात्मिक जीवनाची रचना झाली आहे.त्यातील मुख्य घटक असे :

चार्वाक दर्शन वगळता सर्व दर्शनांनी मुख्य तीन गोष्टी स्वीकारल्या आहेत.त्या म्हणजे , -

### 1) कर्मसिध्दान्त :

कर्म सिध्दांत हा वैदिक हिंदू तत्वज्ञानातील एक उपसिध्दांत आहे. तो फारसा महत्वाचा नाही. अर्थात महत्वाचा नसला तरी तो अतिशय परिणामकारक व प्राचीन आहे. कोणत्याही हिंदू व्यक्तीच्या भोतिक, आध्यात्मिक जीवनावर चांगला वाईट परिणाम करणारा हा सिध्दांत आहे.तो इतका प्रभावी ठरला की बौध्द व जैन धर्मियांनीही तो विविध अर्थांनी स्वीकारला.एवढेच नव्हे तर हिंदूंच्या खूप उशीरा संपर्कात आलेल्या येथील इस्लाम,ख्रिश्चन इ. धर्मियांवरही या सिध्दांताने परिणाम केला आहे.'' हिदू प्रमाणेच आपल्यालाही कर्मसिध्दांत लागू आहे '' असे इतर धर्मियांना वाटत असते.सर्वधर्मिय सुशिक्षित विद्वान पंडितांप्रमाणेच निरक्षर, अडाणी समजल्या जाणाऱ्यांवरही ती प्रभाव टाकतो.शिवाय तो प्रत्येकाला मान्यही असतो. तो का मान्य करावा ? त्याचे कारण त्यांना माहित असतेच, असे नाही. पण कोणत्याही जाती धर्मातील अडाण्यालाही ते मान्य असते. इतका हा सिध्दांत प्रत्येकाच्या तनामनात भिनलेला आहे.

कर्म म्हणजे कृती.व्यक्तीची कोणतीही हालचाल म्हणजे कर्म.ही हालचाल कळत नकळत कशीही होवो प्रत्येक कृती हे कर्मच असते.प्रत्येक कर्म हे पुढच्या कर्माचे कारण असते.कृतीचा परिणाम म्हणजेच कर्माचे फळ असतेच . कर्म या शब्दाचे दोन अर्थ होतात : .

**अ) व्यापक अर्थ** : कोणतीही शारिरीक अथवा मानस्कि कृती कळत किंवा नकळत करणे.

**ब ) संकुचित अर्थ** : जन्म बारसे, लग्न, मृत्यू, श्राध्द इत्यादी सर्व प्रकारची कर्मकांडे .

कर्मसिध्दांतात कर्म या शब्दाचा व्यापक अर्थ अपेक्षित आहे व्यक्ती करीत असलेली कोणतीही कृती म्हणजे कर्म. त्या कृतीचे व्यक्तीला भान असे अथवा नसो ,अज्ञानातून करा व ज्ञानातून करा ; हेतूपूर्वक किंवा निर्हेतूक करा, जागेपणी करो किंवा झोपेत करा , कशीही कृती केली तरी ती 'कर्मच' असते. आणि प्रत्येक कर्म अनिवार्यरित्या फळ देणारेच असते. कर्म फळ अनिवार्य आहे. या सिध्दांताची तीन गृहीत तत्वे आहेत. ती अशी :

**1) जसे कर्म तसे फळ**
**2) कर्माचे भौतिक स्वरुप**
**3) कर्म आणि पुनर्जन्म**

आपण जसे कर्म करु तसे फळ मिळते.कर्माचे स्वरुप व फळ भौतिक असते. कर्म जर मानसिक असेल तर त्याचे फळ मानसिक असते. हात अग्नीत घातला तर ' भाजणे ' हे फळ मिळते, मनातून आशीर्वाद दिला तर मनाला ' आनंद ' होतो. ( तर शिव्या दिल्या तर आपल्याच मनाला आनंद होईलही पण समोरून फल येतेच ! ) 'कर्म केले आणि फळ टळले ' असे कधीही होत नाही. कर्माचा परिणाम म्हणून फळ येतेच.या परिणामास 'विपाक' असे म्हणतात. त्यामुळे कर्मसिध्दांतास '**कर्मविपाक सिध्दांत**', फल देणारे म्हणून '**कर्मफलसिध्दान्त** ' असेही नाव आहे.

Prof . Shriniwas Hemade, hodphilosphy, madshri@gmail.com, 9226563052



जाणते अजाणते, आवडते न आवडते कसेही कर्म केले तरी कर्मविपाक मिळतो . झोपेत चालणारी व्यक्ती उंचावरुन पडली किंवा तिने कोणाचा खून केला तर अनुक्रमे तिचे हातपाय मोडणार किंवा तिला शिक्षा होणारच.अजाणतेपणे बाळाने विस्तव उचलला तर त्याचा हात भाजणारच.खोकल्याचे औषध म्हणून उंदीर मारण्याचे औषध घेतल्याने तर आजारी होणार किंवा मरणार . कुणीही साक्षीदार नसतांना रानांत किंवा घरात दारे खिडक्या बंद करुन; समोरच्या दाराला कुलुप लावून मागच्या दाराने आत येऊन व्यक्ती जी कृती आतमध्ये येवून करेल, तिचे फळ मिळणारच .कृती जशी फळ तसेच अनिवार्यच.

### 2) मोक्ष सिध्दान्त

'मानवी जीवनाचे उद्दिष्ट काय?' हा तत्त्वज्ञानात्मक प्रश्न भारतीय विचारवंतांनी वेगळ्या रितीने सोडविला. माणसाने आयुष्यात जे काही साध्य करावयाचे आहे, ते सत्ता,संपत्ती या बाह्य गोष्टी नसून त्यापेक्षा वेगळे काहीतरी त्याने मिळविले पाहिजे. सत्ता,संपत्ती मिळवून झाल्यानंतरसुध्दा काहीतरी मिळवावयाचे राहून गेले आहे,असे असतेच. सत्ता, संपत्ती या अंतिम साध्य नव्हेत.माणसाने असे काहीतरी मिळवावे की जे मिळविल्यानंतर त्याला '' आता काही मिळवावयाचे उरलेले नाही '' असे वाटले पाहिजे. मग ती गोष्ट कोणती ? या अंतिम साध्याला भारतीय तत्त्वज्ञ मोक्ष असे म्हणतात.चार्वाक वगळता सर्वांनी - वैदिक व अवैदिकांनी ती स्वीकारली आहे.

मोक्ष म्हणजे मुक्ती किंवा सुटका. कशापासून? तर बंधनापासून ? ते कशाचे? संसाराचे ! पर्यायाने वासना आणि पैशाची हाव यांचे. तीव्र वासना आणि अनंत इच्छा यांच्यातून निर्माण होणाऱ्या सुखातून आणि दु:खातून कायमची सुटका म्हणजे मोक्ष. जन्म झाल्याने वासना भोगावी लागते, त्यातून सतत कर्म निर्माण होते, त्यामुळे कर्मफल भोगावे लागते. असे सतत घडते. त्यातून कायमची सुटका म्हणजे मोक्ष.

## (ब)भारतीय दर्शन परंपरा

आपण असे पाहिले की भारतीय तत्त्वज्ञानात चार्वाक,बौध्द,जैन, सांख्य, योग, न्याय, वैशेषिक, पूर्वमीमांसा व वेदान्त दर्शन अशा मुख्य नऊ दर्शनांचा समावेश आहे. त्यातील **आदि शंकराचार्यांचा वेदान्त**, **सांख्य, बौध्द, आणि चार्वाक** या चार दर्शनांचाच अभ्यास आपणास करावयाचा आहे.

### 1) वेदान्त दर्शन

वेदान्त म्हणजे वेदांच्या अंतभागी येणारे किंवा शेवटी येणारे तत्त्वज्ञान होय.वेदांच्या शेवटी येणाऱ्या साहित्यास **उपनिषदे** म्हणतात.ही उपनिषदे अनेक आहेत, म्हणून उपनिषदातील तत्वज्ञान म्हणजे वेदांत असे म्हटले जाते. हा वेदांत शब्दाचा एक अर्थ झाला. दुसरा अर्थ असा की वेद जे माणसाला अंतिमत: सांगतात तो आदेश.

हा अंतिम आदेश काही वाक्यांमध्ये स्पष्ट केलेला आहे. त्यांना अंतीम महत्व असल्याने त्यांना **महावाक्ये** म्हणतात. उदाहरणार्थ ''अहं ब्रह्मास्मि'', ''तत्त्वमसि''. ही महावाक्ये वेगवेगळया उपनिषंदांमध्ये विखुरलेली आहे.ही महावाक्ये म्हणजे भारतीय वैदिक तत्वज्ञानाचा आधार आहे. या उपनिषद वाक्यांचा समन्वय करुन काही सुत्रे रचण्यात आली. त्यांना **वेदांतसूत्रे** म्हणतात. ही सूत्रे अंतीम सत्य असलेल्या ब्रह्याविषयीची आहेत. म्हणून त्यांना **ब्रह्मसूत्रे** म्हणतात. ब्रह्मसूत्रांची रचना वेदव्यास, बादरायण या ऋषींनी केलेली असावी. या सूत्रांची रचना इ.स.पू.450 ते 200 या कालखंडात झाली असावी.

महाभारत कर्ता व्यासमुनी आणि बादरायण व्यास एकच असावा,असा अंदाज आहे. वेंदांतसूत्रात आत्माविषयक व ब्रह्याविषयक प्रतिपादन आहे.हा आत्मा शरीरात राहतो म्हणून या सूत्रांना **शरिरक सूत्रे** असेही नाव आहे. उपनिषदे,त्यातील महावाक्ये,शारीरिक सुत्रे या सगळ्यांचे विचार म्हणजे वेदांताचे तत्वज्ञान, असे समजले जाते.भगवदगीता ही नंतरच्या काळात रचली गेली असली तरी ती सर्व आस्तिक - नास्तिक दर्शनांचा विचार करते.त्यामुळे .भगवदगीतेला सुध्दा तत्वज्ञानाच्या ग्रंथाचा दर्जा आहे.

अशारितीने उपनिषदे,ब्रह्मसूत्रे आणि भगवतगीता या तीन ग्रंथाना वैदिक तत्वज्ञानात सर्वोच्च महत्वाचे स्थान आहे. साऱ्या वेदांत विचारांचा किंबहुना भारतीय तत्त्वज्ञानाचा अभ्यास या तीन ग्रंथापासून सुरु होतो.म्हणून या ग्रंथाना भारतीय तत्त्वज्ञ

Prof . Shriniwas Hemade, hodphilosphy, madshri@gmail.com, 9226563052

ाानाची **'प्रस्थानत्रयी'** म्हणतात. प्रस्थान म्हणजे ज्या ठिकाणाहून निघायचे ते ठिकाण किंवा उगम. त्रयी म्हणजे तीन.या प्रस्थानत्रयीवर वेगवेगळया आचार्यावर भाष्ये केली.किंबहुना प्रस्थानत्रयीवर स्वतंत्रपणे भाष्य करणारा तोच **आचार्य** समजला जातो.असे एक महत्वाचे आचार्य म्हणजे इ.स.8व्या शतकातील शंकराचार्य.

अव्दैत वेदातांत शंकराचार्याचा अव्दैत वेदांत अतिशय प्रभावी आणि लोकमान्य ठरला. जणु काही अव्दैत वेदांत म्हणजे शंकराचार्यांचाच अव्दैत वेदांत असे जगात सर्वत्रच समीकरण झाले आहे. म्हणून आपण या त्यांच्या अद्वैत वेदान्त दर्शनाचा परिचय करुन घेऊ.



## आदि शंकराचार्यांचा अव्दैत वेदान्त




आदि शंकराचार्यांचा जन्म केरळातील 'कालडी' या गावी आठव्या शतकात इ.स.788 साली झाला व त्याचा मृत्यु इ.स.820 मध्ये झाला. या अवघ्या 32 वर्षांच्या आयुष्यात शंकराचार्यांनी केवळ प्रस्थानत्रयीवरच भाष्ये लिहीली, असे नव्हे तर इतरही अनेक रचना केल्या.कवी, भक्त आणि तत्वज्ञ या तिन्हींचा संगम शंकराचार्यांच्या तत्त्वज्ञानात दिसून येतो. त्यांचे **ब्रह्मसूत्रभाष्य** हे वेंदातसुत्रावरील भाष्य अतिशय प्रसिध्द असून ते **शांकरभाष्य** या नावानेही ओळखले जाते.

उपदेश,सहस्त्री, शतलोकी हे ग्रंथ आणि आंनदलहरी,सौंदर्यलहरी ही स्त्रोते अत्यंत प्रसिध्द आहे. शंकराचार्यानी बौध्द व जैन मताचे खंडन करण्यासाठी अव्दैत वेदांताची प्रस्थापना केली. शिवाय प्रसार व प्रचारासाठी चार ठिकाणी त्यांनी कांचीकाम कोटी, शारदा पीठ इत्यादी चार मठ स्थापन केले. या मठांची यात्रा म्हणजेच चारीधाम यात्रा मानली जाते. शंकराचार्यांच्या वेदान्तचे स्वरुप पुढील प्रमाणे.

शंकराचार्याचा अव्दैत वेदान्ताचे सार एका श्लोकात सांगता येईल.

***ब्रह्मन् सत्य जगत् मिथ्या***
***जीवो ब्रह्मैव ना परा:***

याचा अर्थ,

(1)ब्रह्म सत्य आहे.
(2) जग मिथ्या आहे
(3)जीव ब्रह्मच आहे.
(4)याखेरीज दुसरे काहीही नाही.

### *(1) 'ब्रह्म सत्य आहे'* चा अर्थ

अव्दैत वेदांताच्या मते, या जगाचा अंतिम आधार म्हणजे ब्रह्म होय. ब्रह्म हीच अंतिम सद्वस्तु आहे. तिच्या खेरीज अन्य काहीही सत्य नाही.येथे सत्याचा अर्थ(नेहमीच्या दैनंदिन भाषेतील सत्य नव्हे तर ) '' जे कधीही नष्ट होत नाही आणि उत्पन्नही होत नाही; जी **आहे, असते ती ज्ञानाची वस्तू.** ती वस्तु नाही,असे आपण कधीही म्हणू शकत नाही; तेच अंतिम सत्य होय.तच ब्रह्म! ''

तर ब्रह्म म्हणजे जाणीव होत राहणारे भान. हे भान स्वयंसिध्द असते ते **सच्चिदानंद** असते.अर्थ पुढील प्रमाणे.सच्चिदानंद = सत्+चित्+ आनंद

Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052

### 1) 'सत्' चे स्वरुप

सत् म्हणजे जे आहे, जे असते ते. ज्याला खऱ्या अर्थाने अस्तित्व आहे. त्याला सत् किंवा सत्य असे म्हणले जाते. आपण जगाकडे नजर टाकली असता आपणांस असे दिसेल की, एखादी वस्तु विशीष्ट काळी अस्तित्वात येते व कलांतराने नष्ट होते हा काळ लहान मोठया दिर्घकालीन असू शकतो. पण कधी ना कधी ती वस्तु नाही असे घडु शकत नाही. आज नाही तर उदया नाहीतर परवा नाही तर अब्जावधी वर्षानंतर का होईना वस्तु नष्ट होतात. पण ब्रह्म ही अशी सद्‌वस्तु आहे. की जी उत्पन्न होत नाही. आणि नष्टही होत नाही. जी फक्त आहे. ती कोणत्याही स्थलकालापलीकडे आहे.जिला **अस्तित्व** हे विशेषण लावता येईल अशी ती एकमेंव वस्तु आहे.तिलाच खऱ्या अर्थाने सत् म्हणता येते.

### 2) 'चित्' चे स्वरुप

चित् म्हणजे चेतना किंवा जाणीव.या सृष्टीत चेतना असणारा मुख्यत: मानव आहे. काही अंशी वनस्पतींनांही चेतना असते. उरलेला निसर्ग आणि जग निर्जीव आहे.सजीव सृष्टीमध्ये असणारा जीव किंवा चेतना जशी येते अशी ती नष्ट होते. प्रत्येक सजीव निर्जीव होतो. आज न उदया ते नष्ट होते. पण ब्रह्म ही अशी सत् वस्तु आहे की, जिच्यातील चेतना कधीही नष्ट होत नाही.

### 3) 'आनंद'

मनुष्यासह सर्व जिवांना सुख दु:खांची जाणीव होते. आनंद येतो नष्ट होतो. आंनद ही क्षणभंगर बाब आहे.पण ब्रह्म हे सदोदीत आनंदमय आहे. तिथे आनंद नाही, असे कधीही घडत नाही. ते त्याचे स्वरुपचं आहे.

अशारितीने ब्रह्माचे स्वरुप लक्षण म्हणजे सत् चित आंनद रुपत्व होय. हे ब्रहम्याचे गुणधर्म नाहीत तर ते त्याचे स्वरुप आहे.

### *(2)'जग मिथ्या आहे''* चा अर्थ :

मिथ्या हा एक तांत्रिक शब्द आहे. त्याचा अर्थ वेंदातांच्या परिभाषेतच समाजावून घ्यायला पाहिजे. मिथ्या म्हणजे भासात्मक जग.नसताना आहे असे वाटणे. साधारणपणे आपण खरे, खोटे, सत्य असत्य असे शब्द वापरतो, शंकराचार्य मिथ्या शब्द वापरतात. एखादी वस्तु सत्य असते. म्हणजे ती अस्तिवात असते आणि नसते म्हणजे अस्तित्वात नसते. जग अशा तऱ्हेने सत्य असत्य नाही तर ते मिथ्या आहे.

### *(3) 'जीवच ब्रह्म आहे 'याचा अर्थ*

ब्रह्म सत्य आहे. आणि जग मिथ्या आहे, असे म्हटल्यानंतर हे ब्रह्म शोधायचे कसे आणि या जगाचा होणारा आभास नष्ट कसा करावयाचा ? याला वेदांताचे उत्तर असे की, ब्रह्म शोधण्यासाठी कोठे बाहेर जाण्याची गरज नाही. बरे, बाहेर जावे जे दृश्यात्मक विश्व आहे, ते तर नाही तर ब्रह्माचा अनुभव आपण आहोत तेथेच घेत आहे. कसा ? तर , -

जीव (म्हणजे माणूस) हाच ब्रह्म आहे किंवा ज्याला आपण **'मी'** समजतो तोच ब्रह्म आहे किंवा ज्यास आपण जीव म्हणतो तोच वस्तुत: ब्रह्म असतो. व्यवहारात ज्याला आपण जीव समजतो, तो हा जीव नव्हे; तर ब्रह्मरुप असलेला जीव या व्यावहारीक जीवापासून वेगळा आहे.व्यवहारातील जीव शरीरालाच खरे, सत्य मानतो. तो ब्रह्म नाही. मग ब्रह्म असलेला जीव कोणता? तर, *आत्मा अंतरात्मा* किंवा *साक्षी* असे ज्यांस म्हटले जाते, तो जीव म्हणजे ब्रह्म होय. हा आत्मा सर्व जीवांना समान असतो. जीव ब्रह्म आहे याचा अर्थ आत्मा ब्रह्म आहे.

## शंकराचार्याचा मायावाद

ब्रह्म सत्य आहे आणि जगत् मिथ्या आहे,हे एक सिध्द करण्यासाठी एक शंकराचार्यानी मायावाद मांडला.या मायाचे स्वरुप पुढील प्रमाणे.

केवल ब्रह्म सत्य आहे आणि जग मिथ्या आहे,असे केवळ म्हणून भागत नाही, तर ते सिध्दही करावे लागते.समोर जग दिसते आहे,जगचा अनुभव येतो आहे,मी स्वत:च जगाचा भाग आहे.माझे खाणेपिणे.नोकरी शिक्षण इत्यादी जीवन चालू असताना जग अस्तित्वात नाही, असे कसे म्हणता येईल ?

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052

यावर शंकराचार्य म्हणतात की दिसणारे जग हा भास आहे, भ्रम आहे.जसे आपण अंधारात चालत असताना अचानक साप दिसतो, आपण घाबरतो, मागे येतो आणि मग नंतरच्या क्षणी कळते की ती दोरी आहे,साप नाही ! साप नसताना दिसतो आणि दोरी असताना दिसत नाही. अगदी तसे जग अस्तित्वात नाही पण ते दिसते आणि ब्रह्म आहे पण दिसत नाही.म्हणजे जे आहे त्याचे ज्ञान होत नाही आणि जे मूळात नाहीच त्याचा मात्र भास होतो !! हे चमत्कारीक आहे.पण ज्याक्षणी आपणास ब्रह्माचे ज्ञान होते त्याक्षणी जगाचा भासही विलय पावतो.मग फक्त ब्रह्मज्ञानच उरते.या सिध्दान्ताला **विवर्तवाद** म्हणतात.

विवर्त म्हणजे एका वस्तुच्या अस्तित्वाचा दुसऱ्या वस्तुवर आरोप करणे.उदा.दोरीवर सापाचा आरोप करणे.यालाच **अध्यास** असेही नाव आहे.आधी कुठेतरी आपण साप पाहिलेला असतो. तोच नेमका दोरीच्या जागी दिसतो, खरे तर त्याचे स्मरण होते. म्हणून आधी पाहिलेल्या वस्तुचे दुसऱ्या वस्तुच्या ठिकाणी होणारे स्मरण म्हणजे **अध्यास** असे म्हंटले आहे. अध्यासाने जगाचा, व्यवहाराचा भास होतो. तेच सत्य वाटते. हाच **अध्यासवाद** होय.

पण असा भास का होतो? थेट दोरीचे ज्ञान का होत नाही? म्हणजेच जगाचा भास का होतो? थेट ब्रह्मज्ञानच का होत नाही ? यावर शंकराचार्यांचे उत्तर असे की अज्ञान,अविद्या. कशाचे अज्ञान ? तर "मी ब्रह्म आहे " हे ज्ञान न होणे हेच ते अज्ञान किंवा अविद्या.या अविद्येलाच **माया** म्हणतात. जग माया आहे.माया सत्यही नाही असत्यही नाही तर मिथ्या आहे.ती भासते.हा भास मायाशक्तिमुळे होतो.शंकराचार्यांच्या मते माया ही ईश्वराची शक्ति आहे.तिला **प्रकृति** असेही म्हंटले जाते.ही माया ईश्वरच्या अधीन असलेली, त्याच्या नियंत्रणाता असलेली शक्ति आहे.या मायेमुळेच जगाचा भास होतो.

थोडक्यात जीवाच्या ठिकाणी जे अज्ञान असते ती अविद्या आणि ईश्वराची अविद्या म्हणजे माया होय.मायेमुळे अस्तित्वात नसलेले जग अस्तित्वात आहे, असे दिसणे हा **मायावाद** होय.

## सत्तात्रयाचा सिध्दान्त : सत्तेचे तीन प्रकार

ब्रह्म सत्य आहे आणि जगत् मिथ्या आहे,याचा अर्थ जग अस्तित्वातच नाही,असे नाही. शंकराचार्य जगाचे अस्तित्व स्वीकारतात,पण वेगळ्या पातळीवर स्वीकारतात.त्यांच्या मते अस्तित्व म्हणजे सत्ता होय. या सत्तेचे तीन प्रकार ते करतात.ते लक्षात घेतले तर जग अस्तित्वात आहे किंवा नाही, या म्हणण्याचा अर्थ कळू शकतो.ते प्रकार पुढीलप्रमाणे :

### 1) प्रातिभासिक सत्ता :

ज्या वस्तू आहेत, त्यांचा भास होतो असे वाटते ती प्रातिभासिक सत्ता होय.उदा. दोरीवरील साप, मृगजळ इत्यादी.साप नसतोच पण आहेच असे वाटून घाबरले जाते. साप नसला तरी हे घाबरणे खरे असते.तसे जग नसताना जग आहे समजून जगाचे व्यवहार करणे,ही प्रातिभासिक सत्ता आहे.ही सर्वात खालची सत्तेची पातळी होय.

### 2) व्यावहारिक सत्ता :

दैंनदिन व्यवहार ज्यामुळे शक्य होतो ती व्यावहारिक सत्ता होय.या सत्तेमुळे प्रातिभासिक सत्ता विलय पावते. दोरी की साप यातील साप स्वीकरला की घाबरणे,मागे जाणे, काठि हुडकणे सुरु होते हा व्यवहारा सुरु होतो. हीच व्यावहरिक सत्ता होय.म्हणजे जन्म-मरण खरे समजणे,नोकरी,धंदा,खाणेपिणे,संघर्ष जिंकणे ही सारी व्यावहारिक सत्ता होय. ज्यामुळे व्यवहार शक्य होतो.

### 3) पारमार्थिक सत्ता :

व्यावहारिक सत्ता मिथ्या आहे, असा साक्षात्कार झाला की पारमार्थिक सत्तेचा उदय होतो.जग माया आहे आणि मीच ब्रह्म आहे असा साक्षात्कार होणे हा परमार्थ होय.**मीच ब्रह्म आहे,** हेच अद्वैत होय.हा अनुभव आला की वरील सत्तांचा लय होतो आणि जीवाला मोक्ष मिळतो.

थोडक्यात प्रातिभासिक सत्ता आणि व्यावहारिक सत्तेच्या पातळीवरुन पाहता जगाला अस्तित्व असते पण पारमार्थिक सत्तेच्या दृष्टिकोनातून जगाला अस्तित्व नसते तर केवळ ब्रह्मालाच सत्ता असते. ते ब्रह्म मीच असतो,असे शंकराचार्यांना म्हणावयाचे आहे.

## वेदान्ताची ईश्वराची संकल्पना

मायेमुळे जगाचा भास होतो.ईश्वर प्रत्यक्ष ब्रह्मच असला तरी मायेमुळे ब्रह्माचेच दोन प्रकार होतात.

Department of Philosophy, Sangamner College, Sangamner

Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052

अ) माया युक्त ब्रह्म = **सगुण ब्रह्म**

ब) माया मुक्त ब्रह्म = **निर्गुण ब्रह्म**

शंकराचार्यांच्या मते सगुण ब्रह्म हाच ईश्वर होय.तो सगुण ईश्वर असतो. आणि निर्गुण ब्रह्म हा निर्गुण ईश्वर असतो.त्याच प्रमाणे निर्गुण ब्रह्म हेच परब्रह्म असते.ब्रह्म मुळात निर्गुण निराकार असते. त्यामुळे परब्रह्म निर्गुण निराकार असते.

## 2) सांख्य दर्शन



**कपिल मुनी** हा सांख्य दर्शनाचा प्रणेता होय.तो बुध्दाच्याही आधी होवून गेला असावा.त्याने **सांख्यप्रवचनसूत्रे** नावाच्या ग्रंथाची रचना केली.पण ती आज उपलब्ध नाहीत.सांख्यदर्शन ही अतिशय सुंसंगत व बांधेसूद रचना आहे.हे सर्वात बलशाली दर्शन समजले जाते.आजचे सांख्यदर्शनाचा आधार हा 'सांख्यकारिका' नावाचा ग्रंथ आहे. हा ग्रंथ ईश्वरकृष्ण (इ.स.150) या सांख्य पंडिताने लिहिला.नेपालमधील कपिलवस्तु या प्राचीन शहराचे आजचे नाव काठमांडू.तेथे बहुधा कपिल मुनीचे वास्तव्य असावे.सांख्यदर्शन आस्तिक किंवा वैदिक दर्शन असले तरी ईश्वर मानीत नसल्याने ते निरीश्वरवादी दर्शन आहे.

सांख्य हे नाव संख्या या शब्दावरुन पडले असावे.संख्या म्हणजे आकडा.सांख्य दर्शनात विश्वाची मूलतत्त्वे दोन आणि त्यापासून इतर अनेक निर्माण झाली.या सर्वात काय कशासाठी आहे, हे सांगण्यासाठी संख्येवर भर दिला गेल्यामुळे त्यांना सांख्य असे म्हणतात.तसेच सांख्य म्हणजे चर्चा,समीक्षा,चिकीत्सा, विवेकबुध्दि, चिंतन, ज्ञान असाही अर्थ आहे.

### दु:खमुक्ति : सांख्यदर्शनाचा हेतू

सांख्यदर्शनाचा अभ्यास का करावा ? या मागे विशिष्ट हेतू आहे, असे सांख्यंचे म्हणणे आहे.त्यांच्या मते जगात दु:ख आहे.त्या दु:खातून मुक्ति मिळविणे, हाच मानवी जीवनाचा हेतू असला पाहिजे. हे दु:ख तीन प्रकारचे आहे. ते पुढीलप्रमाणे :

**अ) आधिभौतिक :** जीवनातील सामान्य दु:खे.साप चावणे, अपघात होणे,चोरी होणे, अनुत्तीर्ण होण इ.इ.

**ब) आधिदैविक :** दुष्काळ,महापूर,वीज पडणे इत्यादीसारखी नैसर्गिक कारणामुळे होणारे दु:ख .

**क)आध्यात्मिक:**कफ,वात,पित्त आणि काम,क्रोध,लोभ,भय,ईर्ष्या इ.मुळे होणारे शारीरीक - मानसिक दु:ख

### पुरुष - प्रकृति सिध्दान्त

दु:खातून मुक्त होण्याचा एकच उपाय आहे. तो म्हणजे मानवाने आपले मूळ स्वरुप जाणावे.आत्म्याने 'स्व-रुप ' जाणले तर त्याला मोक्ष मिळू शकतो.मोक्षाला सांख्य **कैवल्य** म्हणतात तर आत्म्याला सांख्य **पुरुष** असे नाव देतात.ज्या कारणामुळे दु:ख निर्माण होते त्या कारणाला ते **प्रकृति** म्हणतात. या दोन तत्त्वांनी विश्वाचे नाटक रंगते.वास्तव तयार होते.ही विश्वाची व मानवी जीवनाची दोन मुख्य तत्त्वे आहेत.त्यामुळे सांख्यदर्शनास **'द्वैतवादी दर्शन '** असे नाव आहे.त्यांच्या तत्त्वज्ञानास **'द्वैतवादी वास्तववाद '** आहे.

सांख्यदर्शनाने पुढील सिध्दान्त मांडले :

1. पुरुष आणि प्रकृति या तत्त्वांनी विश्वाची निर्मिती होते.
2. पुरुष चैतन्यमय, निर्गुण, निष्क्रिय आणि संख्येने अनेक आहेत.
3. प्रकृति जड, सगुण, सक्रिय आणि संख्येने एक आहे.
4. प्रकृति पुरुषाला मोहात अडकविते.मग दु:ख निर्माण होते.
5. प्रकृतिपासून वेगळे असलेले *आपले स्वत:चे चैतन्यमय* स्वरूप पुरुषाने ओळखणे हाच मोक्ष होय.

या दोन्ही तत्त्वांचे स्वरुप आणि कार्य पुढीलप्रमाणे :

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*

## पुरुष - प्रकृतिचे स्वरूप व कार्य :

**1) प्रकृति :** त्रिगुण सिध्दांत

ही प्रकृती आहे तरी कशी ? तिचे स्वरुप काय ? या प्रश्नाचे उत्तर प्रकृती त्रिगुणात्मक आहे, म्हणजे सत्व, रजस् आणि तमस् या तीन गुणांची मिळून बनली आहे.हा त्रिगुण सिध्दान्त पुढीलप्रमाणे :

प्रकृति ही विश्वाचे मूळ निर्मितीकारण आहे.ती संख्येने एकच आहे. ती **सत्व, रजस्, तमस्** अशा तीन गुणांनी बनलेली आहे.हे तीन गुण म्हणजे रंग,स्पर्श,वास इत्यादी गुण असतात तसे गुण नाहीत तर ते तिचे घटकगुण असून ते तिचे स्वरूप आहे.तेव्हा प्रकृति **त्रिगुणात्मक** आहे.त्यामुळेच ती सतत परिवर्तनशील आहे. प्रकृती पुरुषाला संसारात अडकविते. पुरुष तिच्यात अडकतो. तिला भोगतो. म्हणजे तिच्यापासून मिळणाऱ्या सुखदु:ख इत्यादीचा अनुभव घेतो. तो भोगतो म्हणून पुरुषाला ***भोक्ता*** म्हणतात. प्रकृती भोगू देते, म्हणून तिला ***भोज्य*** म्हणतात.हा ***भोक्ताभोज्यभाव*** विश्व निर्माण करतो.एखाद्या दोरखंडात तीन दोऱ्या असून त्या दोरीने कशाला तरी एखाद्याला बांधून टाकावे,तसे प्रकृती पुरुषाला तीन गुणांनी बांधून टाकते ! व्यवहारात हे सत्व, रजस्, तमस् तीन गुण आपणास अनुक्रमे आनंद, दु:ख आणि निष्क्रियता यात आढळतात.

1. सत्त्वाचे लक्षण = चमकणे,प्रकाशमान होणे, आनंद देणे,ज्ञान प्राप्त करणे.
2. रजोगुणाचे लक्षण = क्रियाशीलता,गती,हालचाल,कृती करणे,प्रवाहित होणे.
3. तमोगुणाचे लक्षण म्हणजे मंदपणा, गतिहीनता, जडपणा,अज्ञान,अंधार.

सत्व, रजस् व तमस् या तीन गुणांनी मिळून प्रकृती बनते. विश्वातील सारा वस्तुसमूह या तीन गुणांत विभागला आहे.याचा अर्थ असा की कोणतीही वस्तू एकतर सात्विक असते किंवा राजस असते किंवा तामस असतेच.ती पूर्णाशाने या तिन्हीपैंकी एकही नसते. तिचे निरनिराळे अंश सात्विक, राजस, नाही तर तामस यापैकी कोणत्यातरी वर्गीकरणातच असतात.परस्परभिन्न स्वभावाची तेल, वात व ज्योती एकमेकांच्या सहकार्याने प्रकाश निर्माण करतात, त्याप्रमाणे सत्व, रजस् व तमस् हे पस्परविरोधी गुण एकत्र येऊन विश्वातील प्रत्येक पदार्थ बनतो.त्याद्वारे विश्व बनते.

**2) पुरुष**

ही प्रकृती जड आहे.जगाचे निरीक्षण करता जगात जाणीव अथवा ज्ञान नावाची गोष्ट आढळते. तिला स्वतंत्र तत्व मानावे का ? मानावे लागेल. अन्यथा जाणीव अथवा ज्ञान हा प्रकृतीचा विकार आहे असे मानावे लागेल. पण ज्ञान हा प्रकृतिचा गुण अथवा स्वरूप नाही. म्हणून 'ज्ञानाचा प्रवाह चालला आहे' अशी जाणीव ज्यास होते, असा ज्ञाता मानावा लागतो. तो स्वत:च प्रवाही असणार नाही, पण जाणीवयुक्त, चेतनमय असेल तोच पुरुष होय.

येथे पुरुष म्हणजे स्त्रीपुरुषातील पुरुष असे नव्हे, तर कोणत्याही मानवी व्यक्तीमधील चेतनतत्त्व होय. जाणीव होय. पुरु म्हणजे किल्ला. या शरीररूपी किल्ल्यात राहणारा किल्लेदार किंवा शरीरातील चेतनतत्त्व ते पुरुष होय.

पुरुष अनेक आहेत. जगात जितके मानव आहेत तितके पुरुष आहेत.पुरुष सुखीही नसतो व दु:खीही नसतो.तो निर्लेप असतो.तो एकटा, केवल आहे. प्रत्येक पुरुष निर्गुण व केवल साक्षिस्वरुप आहे. पुरुष निर्लेप, नि:संग, निश्चल, निष्क्रिय व उदासीन आहे. तो चेतन आणि द्रष्टा आहे.स्वत:ची केवलता ओळखणे हाच त्याचा मोक्ष आहे.म्हणून मोक्षाला *कैवल्य* असे नाव आहे.



Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*


## सर्ग आणि विलय

विश्वाच्या निर्मितीला किंवा निर्मितीच्या प्रक्रियेला ***सर्ग*** म्हणतात. सर्ग पासून **निसर्ग** शब्द बनतो.निसर्ग म्हणजे सतत निर्माण होत राहाणे. सांख्यांच्या मते विश्वाचा प्रारंभ होतो तेंव्हा पुरूष आणि प्रकृति 'संयोग' अवस्थेत असतात.म्हणजे ते एकत्र असतात, पण पुरुष निष्क्रिय असतो.प्रकृतीचा संसार सुरू करते.या वेळी ती *साम्यावस्थेत* असते.म्हणजे सत्व, रजस्, तमस् हे तिन्ही गुण प्रकृतिमध्ये समान असतात.प्रकृतित हालचाल सुरु झाली की प्रथम तिची साम्यावस्था ढळते. सत्वगुण प्रबल होतो आणि त्यातून *'महत्'* म्हणजे बुध्दि निर्माण होते.महत्पासून *'अहंकार'* निर्माण होतो.अंहकाराचे काम पुरुषात 'मी आणि माझे' हा अभिमान भाव निर्माण करतो.या अभिमानामुळे पुरुषाला "मीच हे सारे काही करीत आहे" असा कर्तेपणा वाटू लागतो.

अहंकाराचे सात्विक,राजस आणि तामसी असे तीन प्रकार असतात.सात्विक अहंकारातून पाच ज्ञानेंद्रिये, पाच कर्मेंद्रिये आणि मन निर्माण होतात.तमस्पासून शब्द,स्पर्श,रुप,रस,गंध अशी पाच ***'तन्मात्रे'*** आणि त्यांचे विषय म्हणून अनुक्रमे आकाश,वायू,अग्नी,जल आणि पृथ्वी अशी पंच ***महाभूते*** निर्माण होतात.तन्मात्र म्हणजे **'केवल तेच'** अर्थात सूक्ष्मभूते. अशा रितीने एकूण पंचवीस तत्त्वांनी प्रकृतीचा संसार सुरु होतो.पुरुष त्यात अडकतो.

ही तत्त्वे अशी :

(1)पुरुष (2) प्रकृति ही दोन (3)महत् (4) अहंकार (5) पाच तन्मात्रे अशी सात, (4) पाच ज्ञानेंद्रिये, पाच कर्मेंद्रिये आणि मन ही अकरा आणि (5) पाच महाभूते अशी एकूण 25 तत्त्वे सर्गप्रक्रियेत असतात.हे पुढीलप्रमाणे :




Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052

पुरुष अक्रीय असल्याने तो विकारहित असतो. तो कशाचेही कारण नसतो. प्रकृती विश्वाचे कारण असते.तिच्यात विकार निर्माण होतात.पुरुष मुळात मुक्त असला तरी अहंकारामुळे स्वत:ला तो कर्ता समजतो.हा त्याचा अविवेक आहे.तेच त्याच्या तीन प्रकारच्या दु:खाचे कारण असते.पण पुरुषाला योगसाधनेद्वारे जेंव्हा आत्मस्वरुपाचा साक्षात्कार होतो तेव्हाच त्याचे विवेकज्ञान जागे होते. तो प्रकृतीच्या खेळाकडे निर्विकारपणे पाहतो.

## पुरुष आणि प्रकृति : संबंध

पुरुषप्रकृतीचे द्वैत मानले पण यातून अनेक अडचणी निर्माण होतात.

**पहिली अडचण** अशी की, मूळ साम्यावस्थेत असलेली प्रकृती कार्यप्रवण का होते ?

सांख्यांच्या म्हणण्याप्रमाणे तिचा सारा खटाटोप पुरुषासाठी असतो. पुरुषाच्या भोगाला स्वत: कारण होऊन त्याला विवेकज्ञान, म्हणजे *आपण प्रकृतीपासून वेगळे आहो* असे ज्ञान उत्पन्न व्हावे व त्यामूळे मोक्ष सिध्द व्हावा, याकरिता प्रकृतीत हालचाल सुरु होते. पण मुळात पुरुष हा निस्संग, निर्लेप असता तो आधी बध्द होतो कसा हेच समजत नाही.

**दुसरी अडचण** अशी की पुरुषाच्या हितासाठी प्रकृती प्रवृत्त का होते ? कारण प्रकृती अचेतन असल्याने तिला स्वार्थही नसतो आणि परार्थही नसतो.

**तिसरी अडचण** अशी की पुरष प्रकृतीत हालचाल घडवून आणतो, तिच्या क्षोभास कारणीभूत होतो, असे म्हणता येत नाही.कारण, पुरुष उघड अकर्ता आहे.

**चौथी अडचण** अशी की प्रकृतीकडून विश्वाची होणारी उभारणी व संहारणी ही सप्रयोजन आहे, सहेतुक आहे, असे दिसते, पण जड प्रकृतीला प्रयोजन कसे असणार ? बरे, पुरुषाचे प्रयोजन आहे असे मानले तरी ते समजण्याची पात्रताही जड प्रकृतीला असणार नाही. तेंव्हा संक्षेपात स्वत:च्या हेतूसाठी पुरुष प्रकृतीला राबवितो, हेही म्हणता येणार नाही.

या साऱ्या अडचणीतून वाट काढण्याचे प्रयत्न सांख्यांनी निरनिराळे दृष्टांन्त देऊन केले.

तीन दृष्टांत :

### (1)आंधळा व पांगळा :

प्रकृती अचेतन असलयाने आंधळी, पुरुष अकर्ता असलयाने पांगळा आहे.आंधळयाच्या पाठीवर बसून पांगळा त्याला वाट दाखवितो व दोघेही मुक्कामाला पोहोचून कार्यसिध्दी होते. याच रीतीने प्रकृती व पुरुष यांच्या संयोगाने प्रकृती परिणाम पावते, असे सांख्य सांगतात.

यावर आक्षेप असा की हा दृष्टांन्त चुकीचा आहे.प्रकृतीला आंधळी म्हटली जाते, तेव्हा त्या आंधळेपणाने तिचे अचेतनत्व दाखवावयाचे असते. पण आंधळा जाणीवरहित किंवा उध्दिष्टरहित नसतो. आंधळ्याला उद्दिष्ट असते.म्हणूनच तर तो पांगळ्याला सहकार्य देतो. पण प्रकृतीला हेतू अथवा प्रयोजन नसते. मग ती पुरुषाला कशी मदत करेल ?

### (2) गाय - वासरू :

प्रकृती व पुरुष यांचा संबंध दाखविण्यासाठी सांख्यकारिकेत गाय वासरूचा एक दृष्टान्त दिला आहे. तो असा: दूध ही एक अचेतन वस्तू आहे. पण वासराची योग्य वाढ व्हावी हा हेतू दुधामागे असतो.वासराला गरज असते, तेव्हाच दूध गाईच्या ठिकाणी उत्पन्न होते व त्यायोगे वासराच्या पोषणाचा हेतू सफळ होतो. तसे पुरुषाला भोग - मोक्ष हवा असतो तेंव्हा प्रकृती भोग-मोक्षाची व्यवस्था करते.

या दृष्टान्तावरही आक्षेप घेण्यासारखा आहे, असे म्हणता येईल की, दूध गाईच्या पोटात राहून काही वासराचे म्हणजे चेतनाचीच अपेक्षा पूर्ण करते.येथे दोनीही चेतन आहेत.त्यामुळे दृष्टांत चुकीचा आहे.

### (3)लोहचुबंक :

ज्याप्रमाणे लोहचुंबक स्वत: उदासीन राहून जवळपासच्या लोखंडी वस्तूत किया घडवून आणतो, त्याचप्रमाणे निश्चल व उदासीन पुरुष प्रकृतीत किया घडवून आणतो.

Department of Philosophy, Sangamner College, Sangamner

पहिल्या दोन्ही दृष्टान्तापेक्षा हा सरस आहे.पण लोखंडाच्या ठिकाणी दिसणारी हालचाल म्हणजे काही प्रयोजनपूर्वक क्रिया नव्हे.ती नुसती यांत्रिक हालचाल असते.अशी यांत्रिक हालचाल व प्रकृतीची योजनाबध्द उत्क्रांन्ती या भिन्न गोष्टी होत.

एकंदरीत कोणत्याही दृष्टान्ताने प्रकृती व पुरुष यांच्या संबंधाचा खुलासा करता येत नाही. हे अगदी साहजिकच आहे. कारण, मुळात सांख्यानी प्रकृति व पुरुष, अचेतन व चेतन, यांच्यांत अनुलंघ्य दरी निर्माण केली आहे.आपल्या नित्याच्या जनुभवात चेतन व जड ही एकमेकांपासून अत्यंत विभक्त असत नाहीत.

### कैवल्य / मोक्ष :


सांख्याच्या मते मते प्रत्येक आत्मा म्हणजे पुरुष एकटा,एकाकी,अलग असाच असतो.त्याचा एकटेपणा हे त्याचे स्वरुप आहे.माझ्याबरोबर अनेकजण आहेत , हा त्याच **भ्रम** असतो.ती माया असते.सुखदु:खापासून आपण वेगळे आहोत हे त्याने जाणले की त्याला मोक्ष मिळतो.मोक्ष म्हणजे स्वत:चे केवलपण जाणणे,हेच **कैवल्य** होय.

---

## 3.बौध्द दर्शन

महात्मा गौतम बुध्दाने स्थापलेला धर्म म्हणजे बुध्दधर्म आणि या धर्माचे तत्त्वज्ञान ते बौध्द दर्शन होय.

गौतम बुध्दाचा जन्म इ.स.पू.563 ला हिमालयाच्या पायथ्याशी असलेल्या कपिलवस्तु नगरीत झाला.बुध्दाला भगवान बुध्द म्हणतात. त्याचे एक महत्वाचे नाव **सिध्दार्थ** .संपूर्ण आशिया खंडात आणि जगातच बौध्द धर्म महत्वाची भूमिका बजावित आहे.तो राजपुत्र होता.जीवनातील सत्ये समजल्याने तो संन्यासी झाला.



बुध्दाने स्वत: कोणतेही ग्रंथ लिहीले नाहीत.पण त्याने केलेल्या उपदेशावर आधारित काही ग्रंथ त्याच्या मृत्यूनंतर लिहीले गेले.ते तीन पेटारे भरुन होते.म्हणून त्यांना **'त्रिपिटक'** म्हणतात. पिटक म्हणजे पेटी/पेटारा. **सुत्तपिटक, अभिधम्मपिटक** आणि **विनयपिटक** अशी त्यांची नावे आहेत.ते पाली भाषेत लिहीले गेले.

मानवी जीवनातील जरा(वृध्दत्व),व्याधी(रोग) आणि मृत्यू पाहून दु:ख हेच सर्वाचे मूळ कारण असल्याचा साक्षात्कार त्याला झाला. तपश्चर्येनंतर जे ज्ञान प्राप्त झाले, ज्या धर्माचे ज्ञन झाले त्यासंबंधातील पहिले प्रवचन त्याने वाराणसीजवळ **सारनाथ** येथे पाच तपस्वी साधूंसमोर दिले .या प्रवचनास **'धर्मचक्रप्रवर्तन** '(धम्मचक्क पवत्तन) असे म्हणतात. भारतच्या राष्ट्रध्वजावर असलेले **अशोकचक्र** धर्मचक्राचेच प्रतिक आहे.या प्रवचनात त्याने ज्या सत्यांचा उपदेश केला ती चार सत्ये आहेत. त्यांना **आर्यसत्ये** म्हणतात. दु:ख,दु:खाचे कारण, दु:खाचा निरोध, दु:खाचा निरोधाचा मार्ग अशी ती चार आर्यसत्ये आहेत. दु:खाचा निरोधाचा मार्ग आठ मार्गांचा आहे,त्यामुळे त्यास **अष्टांगमार्ग** म्हणतात. असा मार्ग प्रथमच कुणीतरी सांगितला म्हणून त्यास ' **आर्य अष्टांगमार्ग** म्हणतात.

बौध्द धर्म व तत्वज्ञान जरी भारतात जन्माला आले तरी त्याचा प्रचार व प्रसार भारताबाहेर झाला. जपान, चीन, थायलंड ही मुख्य राष्ट्रे फिनलंड, जावा, फिलिपाईन्स, मात्र या छोटया राष्ट्रांमध्ये बौध्दधर्म स्विकारला गेला . डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदुधर्माचा त्याग करुन जगातील अनेक धर्मांपैकी ज्या धर्माची सर्वात योग्य व लोकशाही स्वरूपाचा धर्म म्हणून ज्या धर्माची निवड केली तो बौध्द धर्मच होय .खरी वैचारिक क्रांती करणारा हा पहिला धर्म आहे.

चार आर्यसत्य व अष्टांगमार्ग हा बौध्द तत्वज्ञानाचा गाभा म्हणता येईल.अति इंदियोपभोग आणि अतिआत्मक्लेशदायक असा श्रमण मार्ग टाळणारा 'आर्य अष्टांगमार्ग ' त्याने नवा आदर्श म्हणून लोकांपुढे ठेवला.सारासार विवेकाने मध्यममार्ग साधता येतो.हा खरा शुध्दमार्ग होय.त्यालाच ॲरिस्टॉटल **'सुवर्णमध्य'** अशी संज्ञा देतो.या

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052

सुवर्णमध्याचे नीतिशास्त्र जगातच सर्वप्रथम बुध्दाने शोधले.शुध्द प्रज्ञा म्हणजे सद्‌गुण असे सॉक्रेटीस सांगतो. तर 'अविद्येचा नाश हाच निर्वाण' , असे बुध्द सांगतो. आर्य अष्टांगमार्ग ही केवळ भारतीयच नव्हे तर जागतिक नीती विचारात बुध्दाने घातलेली भर अतिशय महत्वाची आहे.

नीती म्हणजे काय ? व्यक्तिगत नीती व सामाजिक नीती यांच्यात परस्पर सामंजस्य का असले पाहिजे ? लोक अनैतिक वागत असले तरी ''मी नैतिक का वागावे'' अशा समस्यांची चर्चा बुध्द अधिक वैज्ञानिक पध्दतीने करतो. गौतम बुध्द हा व्यावहारिक नीतिशास्त्रज्ञ होता. आत्मा,कर्म,पुनर्जन्म, ईश्वर, बह्म अशा कधीही अनुभवास न येणाऱ्या गोष्टी ऐवजी तो रोजच्या दैनंदिन प्रश्नांना अधिक महत्व देणारा आहे. पुरुषार्थ व्यवथा व वर्ण व्यवस्था सांगते त्यापेक्षा जास्त व्यावहारिक मार्ग बुध्द सर्वांना सुचवितो.

भारतीय तत्वज्ञान विचार ज्या मुख्य समस्येने सुरु होतो ती समस्या म्हणजे दु:ख. तिचा विचार बुध्द सुध्दा करतो पण इतर तत्वज्ञाने दु:खाकडून सुखाकडे जाण्यास शिकविलात बुध्द दोन्हीतून मुक्ति मिळवून व्यक्तीने परम शांती कशीला कसे उपलब्ध व्हावे , ते शिकविते.बुध्दांच्या मते व्यक्तिने दु:ख टाळावेच पण सुख देखील टाळावे कारण ते नंतर दु:खच निर्माण करते .त्यामुळे दोन्ही टाळून एका संतुलित शांत अवस्थेला प्राप्त करुन घ्यावे. तिला बुध्द **'निर्वाण '** असे म्हणतो.

बुध्दाचा **आर्यसत्य व अष्टांग मार्गाचा सिध्दांत** पुढील प्रमाणे :

## चार आर्य सत्ये

### (1) <u>पहिले आर्य सत्य :</u> दु:ख

जगात दु:ख आहे आणि भरपूर आहे. त्यामुळेच त्याकडे दुर्लक्ष होते. थोडेसे सुख मिळाले की दु:ख विसरले जाते. आपण स्वत:चे दु:ख विसरतोच पण इतरांच्या दु:खाची दखल घेण्यासही कधी तयार नसतो . बुध्दांच्या मते दु:ख ही एक अतिशय गंभीर व महान वस्तू आहे. त्याच्या अस्तित्वाची सतत जागती जाणीव ठेवली पहिजे. दु:खाची कदर केली पाहिजे.त्याचा आदर केला पाहिजे. म्हणून बुध्द घोषणा करतो , '' दु:ख हे पहिले आर्यसत्य आहे . त्याचा विसर पडू देवू नका.''

### (2) <u>दुसरे आर्यसत्य :</u> दु:ख कारण : दु:ख समुदय (दु:खाचा उगम)

आहे ते स्विकारले पाहिजे,यात शंका नाही आता पुढचा प्रश्न दु:ख का आहे ? त्याचे कारण काय ? दु:खाला कारण आहे , हे दुसरे आर्यसत्य आहे.कारणाशिवाय कोणतीही घटना घडत नाही. म्हणून दु:खालाही कारण आहे.दु:खाचे कारण म्हणजे अमर्याद वासना. वासना म्हणजे इच्छा.वासनेला बुध्द ' तृष्णा ' ( तहान ) असे म्हणतो . तृष्णेमुळे दु:ख निर्माण होते.सतत काहीतरी हवे असणे म्हणजे सतत इच्छा करणे ही वासना होय

### <u>(3 )तिसरे आर्य सत्य :</u> दु:ख निरोध :

निरोध करुन दु:ख नाहीसे करता येते.यास दु:ख निषेध किंवा दु:ख निरोध असे म्हटले आहे.तृष्णेचा संपूर्ण त्याग सम्यक् वैराग्य किंवा अनासक्ती हे याचे स्वरूप आहे.

प्रथम बुध्द दु:खाची जाणीव करुन देतो नंतर त्याचे कारण सांगतो आणि मग ते नष्ट करता येते असा दिलासा देतो आता तो त्या दु:ख निरोधाचा मार्गही सांगतो म्हणून दु:ख निरोधाचा मार्ग हे चौथे आर्यसत्य होय..

### <u>(4) चौथे आर्यसत्य :</u>

## दु:ख निरोधाचा मार्ग : दु:ख निरोध गामिनी प्रतिपदा

बुध्दाच्या मते दु:ख आहे. दु:खाचे कारण तृष्णा आहे . दु:ख आणि तृष्णा दोन्हीही नष्ट करता येतात.हा मानवी जीवनातील दिलासा आहे. कसे नष्ट करावयाचे दु:ख आणि तृष्णा ? तर त्याचा एक विशिष्ट मार्ग आहे. ही एक साधना आहे . आठ अंगानी किंवा आठ टप्प्यांनी हे दु:ख नष्ट करता येते. म्हणून त्यास अष्टांग मार्ग असे म्हणतात. तो पहिला भाग आहे म्हणून त्यास '**आर्य अष्टांगिक मार्ग**' असेही म्हटले आहे.प्रत्येक अंगास **सम्यक्** म्हणतात.सम्यक् म्हणजे शुभ, शिव, चांगले किंवा योग्य.

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*



बुध्दाच्या मते जगात दु:ख आहे. दु:खाचे कारण तृष्णा आहे.दु:ख आणि तृष्णा दोन्हीही नष्ट करता येतात.हा मानवी जीवनातील दिलासा आहे. कसे नष्ट करावयाचे दु:ख आणि तृष्णा ? तर त्याचा एक विशिष्ट मार्ग आहे. ही एक साधना आहे . आठ अंगानी किंवा आठ टप्प्यांनी हे दु:ख नष्ट करता येते. म्हणून त्यास **अष्टांग मार्ग** असे म्हणतात. त्यास ***'आर्य अष्टांगिक मार्ग'*** असेही म्हटले आहे.प्रत्येक अंगास सम्यक् म्हणतात.सम्यक् म्हणजे शुभ,शिव, चांगले किंवा योग्य.

## आर्य अष्टांगमार्ग

1) *सम्यक दृष्टी* : चार आर्य सत्याचे ज्ञान
2) *सम्यक संकल्प* : चांगला विचार,सर्व प्राणी मात्राविषयी प्रेम, आदर बाळगणे.
3) *सम्यक वाचा* : चांगले बोलणे,खोटे न बोलणे, परनिंदा न करणे, कटु शब्द न उच्चारणे.
4) *सम्यक कर्मांत* : चोरी न करणे, दुसऱ्याचे प्राण न होणे. इंद्रियावर संयम ठेवणे.
5) *सम्यक आजीव* : योग्य मार्गाने नोकरी धंदा करून उपजीविका करणे.लबाडी शोषण न करणे.
6) *सम्यक व्यायाम* : मनातील वाईट विचार काढणे व त्याजागी शुभ विचार स्थापने.
7) *सम्यक स्मृती* : अनित्यतेची जाणीव ठेवणे, ''मी '' नावाचा आत्मा नाही याचे स्मरण ठेवणे
8) *सम्यक समाधी* : परम शांती अनुभवणे.

चार आर्य सत्याच्या प्राप्तीनतर कोणत्याही जातीधर्माच्या स्त्री पुरुषांना निर्वाणाची अवस्था प्राप्त होते. ह्या निर्वाणाची संकल्पना संक्षेपात पुढीलप्रमाणे:

## निर्वाण संकल्पना :

निर्वाण म्हणजे शांत होणे, विझणे . कशापासून शांत होणे ? तर दु:खाच्या अग्पिासून शांत होणे, दु:ख आग्नि विझविणे . आता केवळ दु:ख नष्ट करणे नव्हे तर सुख सुध्दा नष्ट करणे म्हणजे निर्वाण.कारण सु:खानंतर पुन्हा दु:ख येते आणि दु:खानंतर परत सुखाची तृष्णा निर्माण होते .म्हणून बुध्दाचा अष्टांग मार्ग केवळ दु:खातून सुटका सांगत नाही तर सुखातूनही सुटका सांगतो .तो सुख दु:खाच्या पलिकडे जाण्यास सांगतो.

## अनित्यततावाद आणि अनात्मवाद

बौध्दांच्या मते, जग सतत परिवर्तनशील आहे, त्यामुळे जगात स्थिर, नित्य असे काहीही तत्त्व नाही.सगळे अनित्य आहे. जगाकडे पाहाता आपल्या लक्षात येते की आजुबाजूच्या सर्वच गोष्टी नाशवंत आहेत, घर, पुस्तक, खुर्ची साऱ्या वस्तू, प्राणी नष्ट होतात. अगदी चिरस्थायी वाटणारा डोंगर,प र्वत, समुद्र सुध्दा काही लाख वर्षांनी ते असणार नाहीत. नष्ट होणारी कोणतीही गोष्ट आकस्मात एका क्षणी नष्ट होते, असे मानता येणार नाही.आपणांस न दिसणारे फरक दर क्षणाला घडत असतात. फरक पडणे म्हणजे पहिली गोष्ट नष्ट होणे व दुसरी उत्पन्न होणे, असेच मानावे लागते. याचाच अर्थ असा की, कुठलाही पदार्थ एक क्षणपर्यंत टिकून राहतो व दुस-या क्षणी त्यात फरक पडतो व तो नष्ट होतो.क्षडणभर टिकणे व नष्ट होणे, असे सतत घडते, हा **क्षणभंगवाद** होय. जग अनित्य आहे, ते नित्य नाही, हाच **अनित्यतावाद** होय.

प्रत्येकक्षणाला उत्पन्न होणे आणि त्याच क्षणाला नष्टही होणे, असे सतत घडणे म्हणजे त्यांचा संतत प्रवाह तयार होणे,असते. मातीचे मडके हे वास्तवात मडके एका क्षणाला निर्माण होणे आणि दुसऱ्या क्षणाला नष्ट होणे होय. असे सतत घडणे म्हणजे त्यांची एक मालिका तयार होणे. सतत म्हणजे संतत. जे संतत असते ते संतान अथवा संतति असते. मडक्याच्या संतानालाच आपण अज्ञानाने एक मडके म्हणत असतो.हा **संतानवाद** होय.

## अनात्मवाद

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*

बौध्दांच्या मते जग सतत परिवर्तनशील आहे, त्यामुळे जगात स्थिर असे काहीही तत्त्व नाही. हाच नियम आत्मा नामक द्रव्यालाही लागू आहे. आपल्या अनुभवास येणा-या परिवर्तनशील गुणधर्मांना आश्रय देणारा आत्मा नामक काहीही नित्य पदार्थ नसतो, हा त्यांचा **अनात्मवाद** होय.

क्षणात अस्तित्वात येणे व दुसऱ्याक्षणी नष्ट होणे या सिध्दान्तला क्षणभंगवाद म्हणतात. तो केवळ बाह्य जड पदार्थांना म्हणजे जगालाच लागू आहे असे नाही, तर आंतरिक पदार्थांना म्हणजे **आत्मा** नावाचा तत्त्वालाही लागू आहे. वेदांती इत्यादि आत्मावादी ज्याला स्थिर आत्मा म्हणतात तसा आत्मा नसतो. या ठिकाणी बौध्द 'चित्तचैत्यस्कंध ' नावाची संकल्पना मांडतात. जसे गेल्या क्षणीचे मडके आणि या क्षणीचे मडके जसे एकमेकांहून निराळे, तसेच ''गेल्या क्षणीचा' मी आणि 'या क्षणीचा मी ''हेही एकमेकांपासून वेगळेच असतात.



### बुध्द एक वैद्य :

बुध्दाच्या मते दु:ख हा जणू रोग आहे. जात, धर्म, वंश, लिंग असा कसलाही भेद न करता हा रोग प्रत्येकाला पकडतो आणि अनिवार्य इच्छा, लोभ हावरटपणा, तृष्णा हे या रोगाचे कारण आहे .दु:ख आणि तृष्णा नष्ट करण्याचा उपाय सुध्दा आहे आणि तो उपाय म्हणजे अष्टांग मार्ग .हे औषध देणारा बुध्द हा एक वैद्यराज आहे.

## 4) चार्वाक दर्शन

चार्वाक ही संज्ञा 'चारु ' या धातूपासून तयार होते. चारु म्हणजे गोड बोलणे.त्यामुळे गोड बोलून काम करणे अथवा करुन घेणारे तत्त्वज्ञान असा त्याचा अर्थ होतो.पण हा अर्थात उचित, योग्य अर्थ नाही. चार्वाक नावाचा विचारवंत प्राचीन काळात होवून गेला असावा.या चार्वाकाचा जन्म इ.स.पू.2440 साली झाला असावा, असा समज आहे. हा एक विद्वान ,पक्व बुध्दिचा ब्राह्मण होता. महाभारतात एक चार्वाक नावाच्या विद्वान ब्राह्मणाचा उल्लेख येतो. चार्वाकाने मांडलेले विचार लोकांना मान्य झाले. त्याच्या तत्त्वज्ञानास 'लोकायत' असेही नाव आहे. अर्थात काही अभ्यासकांच्या [3] मते लोकायत व चार्वाक यांच्या तत्त्वज्ञानात फरक आहे.

काहीजणांच्या मते बृहस्पती नामक देवगुरुने ही विचारसरणी मांडली. त्यामुळे या तत्त्वज्ञानास **'बृहस्पती दर्शन'** अथवा **बार्हसपत्यदर्शन** असेही नाव आहे. बृहस्पतीने हे तत्त्वज्ञान सूत्र म्हणजे श्लोकरुपात मांडले.त्यांना **'बार्हस्पत्यसूत्रे'** असे नाव आहे.



चार्वाकांच्या मते प्रत्यक्ष अनुभव हेच केवळ ज्ञानाचे साधन आहे.ज्यांचा आपल्या ज्ञानेंद्रियांना प्रत्यक्ष अनुभव येवू शकतो,तेच सत्य असून इतर गोष्टीवर विश्वास ठेवता येत नाही.अनुभवालाच ते **'प्रत्यक्ष'** (Perception) असे म्हणतात.

### जडवाद

प्रत्यक्षाने आपणास कशाचा अनुभव येतो ? चार्वाकांचा मते प्रत्यक्षाने आपणास केवळ भौतिक जगाचाच अनुभव येतो.जगाचे चार घटक आहेत. पृथ्वी,अग्नी,वायू आणि जल.यांना महाभूते म्हणतात.केवळ हीच चार महाभूते अस्तित्वात

[3] LOKAYAT : D. P. Chattopadhya आणि लोकायत : स. रा. गाडगीळ.

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

असतात. ही महाभूते भौतिक आहेत.ती चार्वाक स्वीकारतात.त्यामुळे चार्वाकांना भौतिकवादी अथवा **जडवादी** तत्त्वज्ञ म्हंटले जाते. आकाश नावाचे पाचवे महाभूत इतर वैदिक दर्शने स्वीकारतात.मात्र चार्वाकांच्या मते आकाशाचा अनुभव येत नाही,त्यामुळे आकाश अस्तित्वात नाही.थोडक्यात, चार महाभूते जड आहेत, चैतन्यमय नाहीत. जडातूनच चैतन्याच विकास होतो, उलटे घडत नाही. जड तत्त्वांमधून चैतनमय सृष्टि व सजीव, माणसे निर्माण होतात. हा चार्वाकांचा सिध्दांत म्हणजे **जडवाद** होय.

अशा जड स्वरूपी जगाचे ज्ञानही जडाचा आविष्कार असलेली इंद्रियांमार्फतच होते. ज्ञानाची वस्तू जड म्हणून साधनही जडच अशी चार्वाकांची भूमिका आहे. त्यांच्या मते, प्रत्यक्ष जगताच्या ज्ञानाचे साधन सुध्दा प्रत्यक्षच असते. प्रत्यक्ष हेच ज्ञानाचे ेकमेव साधन होय. ज्याचे प्रत्यक्ष होवू शकत नाही ते अस्तित्वात नाही,असे चार्वाक समजतात. त्यानुसार **चार्वाक तत्त्वज्ञ अंतिम सत्य,आत्मा,ईश्वर,ब्रह्म अशा तत्त्वांवर विश्वास ठेवित नाहीत.ते भौतिकवादी आहेत.**



## देहात्मवाद

''मी उंच आहे'', ''मी हुशार आहे'' इत्यादी विधानांमधील 'मी' म्हणजे शरीर असते, आत्मा नाही. आपल्याला ज्याचा प्रत्यक्ष अनुभव येतो तो शरीराचा.त्यामुळे **मी म्हणजे शरीर** होय.आत्मा मानावयाचाच असला तर देहालाच आत्मा मानावे.''देह हाच आत्मा'' असे चार्वाक म्हणतात. देह चार महाभूतांपासूनच बनतो.ते एकत्र आले की शरीरात चेतना निर्माण होते.जसे कात,चुना,तंबाखू पानात घालून खाल्ल्यानंतर मुळात अस्तित्वात नसलेला लाल रंग तयार होतो,तसे चार महाभूते एकत्र आली की शरीरात चैतन्य निर्माण होते.या चैतन्यालाच काही लोक चुकून 'आत्मा' म्हणतात,तथापि आपणास आत्म्याचा कोणताही अनुभव येत नाही.त्यामुळे आत्मा नावाचे द्रव्य नसते.माणूस मरतो याचा अर्थ ही चार महाभूते वेगवेगळी होतात,एवढेच.म्हणूनच पुर्नजन्म नसतो. एकदा देहाची राख झाली की पुन्हा जन्म मिळत नसतो.या सिध्दान्तास **देहात्मवाद** म्हणतात.

आत्म्याप्रमाणेच ईश्वरचाही आपणांस कधीही अनुभव येत नाही.हे जग चार माहभूते एकत्र येवून निर्माण झालेले आहे.ते कुणी निर्माण केलेले नाही,त्यास कोणीही निर्माता नाही. त्यामुळेच कोणतेही धार्मिक ग्रंथ स्वीकारणे चूक आणि दिशाभूल करणारे आहे.कसलेही कर्मकांड,पूर्जाअर्चा,जपजाप्य करणे हा मुर्खपणा आहे.

## सुखवाद

एकदा देहाची राख झाली की पुन्हा जन्म मिळत नसल्याने माणसाने या मिळालेला जन्म केवळ सुख मिळविण्यातच घालवावा.माणसाचे सर्वोच्च ध्येय केवळ सुख हेच असले पाहिजे.प्रत्यक्षानुभवाने जे मिळते ते सुखच असते.मानवी जीवन सुखी करण्यासाठी मानवाने जीवनशिक्षण, शेती, व्यवसाय, उद्योग, साहित्य, संगीत, कला, नाट्य, चिंतन यांची निर्मिती करावी. त्यांचा उपभोग घ्यावा आणि सुखाने जगावे,असा **सुखवाद** चार्वाक मांडतात.

चार्वाकांनी अशा प्रकारे त्यांचा भौतिकवाद (Materialism) मांडला.या भूमिकेतूनच ते वैदिकांचे - म्हणजे हिंदुधर्माचा आधार असलेले वेदग्रंथ,धर्मग्रंथ नाकारतात.म्हणून त्यांना नास्तिक / अवैदिक म्हंटले आहे.चार्वाकांचे वैशिष्ट्य असे की त्यांनी जैन आणि बौध्द दर्शनास सुध्दा विरोध केला.

******************************

Department of Philosophy, Sangamner College, Sangamner